वाचा :- १) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांचेकडील आदेश क्रमांक जिपना/आरोग्य/आस्था ३/६८०/२००४ दिनांक १८/१२/२००४

२) महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,विमुक्तजाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम,२००० मधील कलम ८,९ व १० नुसार

३) सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-२०१२/प्रक्र३३२/१२/१६ ब दि.१८ मे २०१३

४) सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-२०१५/प्रक्र२७६ A/१५/१६ ब दि. २१ ऑक्टोबर २०१५

५) या कार्यालयाची कारणेदाखवा नोटिस क्रमांक जिपना/आरोग्य/आस्था ५/११८३/२०१६ दिनांक २९/११/२०१६

६) या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटिस क्रमांक /जिपना/आरोग्य/आस्था-५/१८५/२०१७ दिनांक २०/२/२०१७.

७) कार्यालयाची मंजूर टिप्पणी दिनांक 9 /७/२०१७

**आदेश**

नाशिक जिल्हा परिषद नाशिक
आरोग्य विभाग
जा.क्र.जिपना/आरोग्य/आस्था-३/ 282 /२०१७
नाशिक दिनांक 9 /७/२०१७

ज्या अर्थी श्रीमती सरला रविंद्र महाले, प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना नाशिक जिल्हा परिषद अतंर्गत अनुसूचित जमाती या प्रवर्गाचा लाभ देऊन प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदी दिनांक १८/१२/२००४ रोजीचे आदेशान्वये नियुक्ती दिलेली आहे. नियुक्ती आदेशांत सक्षम अधिकारी यांचे वैधता प्रमाणपत्र तीन महिन्याचे आंत सादर करणे बंधनकारक राहिल जात प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न केलेस किंवा जातीबाबत तफावत आढळलेस उमेदवारांना सेवेतून कमी करणेत येईल असे नमुद केलेले होते. जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत अनुसूचित जमाती या प्रवर्गातून प्रयोशाळा तंत्रज्ञ या पदी नियुक्ती झालेली असल्याने महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,विमुक्तजाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम,२००० मधील कलम ८ नुसार श्रीमती सरला रामचंद्र महाले हया अनुसूचित जमातीचे आहात हे सिध्द करण्याची सर्वस्वी जबाबदारी त्यांची आहे. श्रीमती महाले हया २८/३/२००५ रोजी सेवेत जिल्हा परिषद सेवेत हजर झाल्या आहेत.

त्यानुसार श्रीमती सरला रविंद्र महाले प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांनी जात वैधता प्रमाणपत्र संदर्भ क्रमांक १ ते ४ नुसार जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक होते. त्यांनी अदयाप त्यांचे जातीचे वैधता प्रमाणपत्र या कार्यालयाकडे सादर केलेले नाही.

वाचा क्रमांक ५ दिनांक २०/११/२०१६ ची कारणे दाखवा नोटीस श्रीमती महाले यांना देऊन जात वैधताप्रमाणपत्र सादर न केल्यांस सेवा समाप्त करण्यांत येतील असे कळविले होते. श्रीमती महाले यांनी सदरचे नोटीसीस श्रीमती महाले यांनी त्यांचे दिनांक २६/१२/२०१६ चे पत्रान्वये खुलासा केला आहे. खुलाशासमवेत श्रीमती महाले यांनी त्यांना मा.उपसंचालक (सं.) तथा सदस्य सचिव, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नंदूरबार यांनी त्यांना दिलेली दिनांक २०/६/२०१६ चे पत्राची प्रत सादर केली आहे. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध करून दिले नाही.

वाचा क्रमांक ६ दिनांक २०/०२/२०१७ ची अंतिम कारणे दाखवा नोटीस श्रीमती महाले यांना एक अंतिम संधी म्हणून एक महिन्याच्या आंत जात पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त करुन घेऊन सादर करावे तसे न केल्यांस सेवा समाप्त करण्यांची कार्यवाही करणेत येईल असे कळविले होते. श्रीमती महाले यांनी सदरचे नोटीसीस यांनी त्यांचे दिनांक २०/०३/२०१७ चे पत्रान्वये खुलासा केला आहे. खुलाशासमवेत श्रीमती महाले यांनी त्यांना मा.उपसंचालक (सं.) तथा सदस्य सचिव, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नंदूरबार यांनी दिनांक २०/१/२०१७ चे सुनावणीकामी हजर राहणेबाबतचे पत्राची प्रत जोडली आहे. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिले नाही.

त्या अर्थी श्रीमती सरला रविंद्र महाले प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना पुरेशी संधी देऊनही त्यांनी अनुसूचित जमाती या प्रवर्गाचे जातीचे पडताळणी प्रमाणपत्र ( Cast Validity Certificate ) प्रत सादर न केल्याने मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक अंतिम कारणे दाखवा नोटीसीत नमूद केलेप्रमाणे महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,विमुक्तजाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम,२००० मधील कलम १० चे तरतूदीनुसार श्रीमती सरला रविंद्र महाले प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांची या आदेशाच्या दिनांकापासून नाशिक जिल्हा परिषदेकडील प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदावरील सेवा समाप्त करीत आहे. प्रस्तुत आदेशाची नोंद श्रीमती सरला रविंद्र महाले प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांचे मूळ सेवापुस्तकात घेण्यांत यावी.

(दीपक कुमार मीना)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

प्रति:- श्रीमती सरला रविंद्र महाले,प्रयोगशाळा तंत्रज्ञ, प्राथमिक आरोग्य केंद्र भुवन ता पेठ जिल्हा नाशिक
द्वारा - *गट विकास अधिकारी पंचायत समिती पेठ*

प्रत:- गटविकास अधिकारी, पंचायत समिती पेठ.

२/- समवेत आदेशाच्या ३ प्रती जोडलेल्या असून त्यापैकी १ प्रत श्रीमती सरला रामचंद्र महाले प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना बजावून दुसऱ्या प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेऊन सदरची प्रत इकडील कार्यालयाकडे सादर करावी.

प्रत :- निवड नस्ती

प्रत:- सिवस सहायक मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. नाशिक

प्रत:- मध्यवर्ती माहिती तंत्रज्ञान कक्ष (आयटी सेल) सामान्य प्रशासन विभाग जि.प. नाशिक

वाचा :- १) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांचेकडील आदेश क्रमांक जिपना/आरोग्य/आस्था ५/१२०/२०१५ दिनांक ८/१/२०१५

२) महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,विमुक्तजाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम,२००० मधील कलम ८,९ व १० नुसार

३) सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-२०१२/प्रक्र३३२/१२/१६ ब दि.१८ मे २०१३

४) सामान्य प्रशासन विभाग,शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-२०१५/प्रक्र२७६ A/१५/१६ ब दि. २१ ऑक्टोबर २०१५

५) या कार्यालयाची कारणेदाखवा नोटिस क्रमांक जिपना/आरोग्य/आस्था ५/११७४/२०१६ दिनांक २९/११/२०१६

६) या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटिस क्रमांक /जिपना/आरोग्य/आस्था-५/१७९/२०१७ दिनांक २०/२/२०१७

७) कार्यालयाची मंजूर टिप्पणी दिनांक ७ /७/२०१७

---

आदेश

नाशिक जिल्हा परिषद नाशिक
आरोग्य विभाग
जा.क्र.जिपना/आरोग्य/आस्था-५/ ९५० /२०१७
नाशिक दिनांक ७ /७/२०१७

ज्या अर्थी श्रीमती मोनिका नामदेव कराटे यांना नाशिक जिल्हा परिषद अंतर्गत अनूसूचित क्षेत्रातील अनुसूचित जमाती उमेदवार म्हणून आरोग्य सेवक महिला या पदी दिनांक ०८/१/२०१५ रोजीचे आदेशान्वये नियुक्ती दिलेली आहे. नियुक्ती आदेशातील अट क्रमांक १९ मध्ये शासन निर्णय दिनांक १२/१२/२०११ नुसार मागासवर्गीय उमेदवारांनी नियुक्ती आदेश दिल्यापासून ६ महिन्याच्या आंत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. तसेच सदरचे जात वैधता प्रमाणपत्र मुदतीत सादर न केल्यास आपली नेमणुक संपुष्टात आणणेत येईल याची नोंद घ्यावी असेही नमुद केलेले आहे. जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत अनुसूचित जमाती या प्रवर्गातून आरोग्य सेवक महिला या पदी नियुक्ती झालेली असल्याने महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,विमुक्तजाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम,२००० मधील कलम ८ नुसार श्रीमती मोनिका नामदेव कराटे आरोग्य सेविका महिला हया अनुसूचित जमातीच्या आहेत हे सिध्द करण्याची सर्वस्वी जबाबदारी त्यांची आहे. श्रीमती कराटे हया दिनांक १२/१/२०१५ रोजी जिल्हा परिषद सेवेत हजर झाल्या आहेत.

त्यानुसार श्रीमती मोनिका नामदेव कराटे आरोग्य सेविका महिला यांनी जात वैधता प्रमाणपत्र संदर्भ क्रमांक १ ते ४ नुसार जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक होते. त्यांनी अदयाप त्यांचे जातीचे वैधता प्रमाणपत्र या कार्यालयाकडे सादर केलेले नाही.

वाचा क्रमांक ५ दिनांक २०/११/२०१६ ची कारणे दाखवा नोटीस श्रीमती कराटे यांना देऊन जात वैधताप्रमाणपत्र सादर न केल्यांस सेवा समाप्त करण्यांत येतील असे कळविले होते. श्रीमती कराटे यांनी सदरचे नोटीसीस त्यांचे दिनांक २०/१२/२०१६ चे पत्रान्वये खुलासा केला आहे. खुलाशासमवेत श्रीमती कराटे यांनी अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक विभाग, यांचेकडेस प्रकरण सादर केल्याची अर्जाचा आवक ६८०७, दिनांक १०/७/२०१५ ची प्रत जोडली आहे. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिले नाही.

वाचा क्रमांक ६ दिनांक २०/०२/२०१७ ची अंतिम कारणे दाखवा नोटीस श्रीमती कराटे यांना देऊन एक अंतिम संधी म्हणून एक महिन्याच्या आंत अनुसूचित जमातीचे जात पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त करुन घेऊन सादर करावे तसे न केल्यांस सेवा समाप्त करण्यांची कार्यवाही करणेत येईल असे कळविले होते. तरीही श्रीमती कराटे यांनी अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिलेले नाही.

त्या अर्थी श्रीमती मोनिका नामदेव कराटे, आरोग्य सेवक महिला यांना पुरेशी संधी देऊनही अनुसूचित जमाती या प्रवर्गाचे जातीचे पडताळणी प्रमाणपत्र ( Cast Validity Certificate ) सादर न केल्याने मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक अंतिम कारणे दाखवा नोटीसीत नमूद केलेप्रमाणे महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,विमुक्तजाती,भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम,२००० मधील कलम १० चे तरतूदीनुसार श्रीमती मोनिका नामदेव कराटे आरोग्य सेवक महिला यांची या आदेशाच्या दिनांकापासून नाशिक जिल्हा परिषदेकडील आरोग्य सेवक महिला या पदावरील सेवा समाप्त करीत आहे. प्रस्तुत आदेशाची नोंद श्रीमती मोनिका नामदेव कराटे यांचे मूळ सेवापुस्तकात घेण्यांत यावी.

Deepak

(दीपक कुमार मीना)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

प्रति:- श्रीमती मोनिका नामदेव कराटे आरोग्य सेवक महिला , प्राथमिक आरोग्य केंद्र वारे ता दिंडोरी जिल्हा नाशिक
द्वारा - गट विकास अधिकारी पंचायत समिती दिंडोरी

प्रत:- गटविकास अधिकारी, पंचायत समिती दिंडोरी
२/- समवेत आदेशाच्या ३ प्रती जोडलेल्या असून त्यापैकी १ प्रत श्रीमती मोनिका नामदेव कराटे यांना बजावून दुसऱ्या प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेऊन सदरची प्रत इकडील कार्यालयाकडे सादर करावी.

प्रत :- निवड नस्ती

प्रत :- विशेष सहाय्यक मुख्य कार्यकारी जि.प. नाशिक यांचेकडे माहितीसाठी

प्रत :- मध्यवर्ती माहिती संकलन कक्ष (आयएसओ) सामान्य प्रशासन विभाग जि.प. नाशिक